# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३**

## महसूल व वन विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ११**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५३, जिल्हा प्रशासन**<br>**बाब क्रमांक: ५३, रूपये:- ३,२२,५९,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (१) | ६१५७ | १० | सन २०१४ नंतर नव्याने तहसीलदार व उपविभागीय कार्यालयास (प्रांत) मान्यता देण्यात आलेली आहे त्याप्रमाणे नव्याने कर्मचारी भरती करून त्या कार्यालयात अधिकारी कर्मचारी वर्ग देणे आवश्यक होते, परंतु तसे झालेले नाही सन २०१४ नंतर महसूल कारकून या पदाची भरती केली नाही तसेच सन २०१४ ते २०२३ यादरम्यान महसूल सहाय्यक यांचे प्रमोशन होऊन बरेच पदे रिक्त झालेले असणे, रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २८५३ , अलोहयुक्त खाणकाम व धातूशास्त्रीय उद्योग**<br>**बाब क्रमांक: ५९, रूपये:- ४,८८,९०,९१,०००/-**<br>**श्री. बळवंत वानखडे** |
| (२) | ६०९७ | १० | राज्यात नव्याने राबवण्यात येणाऱ्या सवर्कश वाळू धोरणानुसार अमरावती जिल्ह्यातील वाळू घाट लिलाव करण्याबाबत वारंवार जाहिरात तसेच ई निविदा प्रक्रिया राबवण्यात येत असणे, परंतु या वाळू घाट लिलावास कुठलाही प्रतिसाद आलेला नसणे , वाळू घाट लिलाव झाला नसल्याने जिल्ह्यातील वाळू माफिया सर्रासपणे नदीपात्रातून वाळूची चोरी करून दुप्पट भावाने वाळू विक्री करीत असणे , यांचा थेट परिणाम घरकुल बांधकामांवर होणे , वाळूचे भाव तस्करामार्फत वाढवल्याने घरकुल लाभार्थ्यांना जादा दरात वाळू खरेदी करणे शक्य नसल्याने ग्रामीण तसेच शहरी भागातील घरकुलांचे काम थंडबसत्यात असणे , अमरावती जिल्ह्यात अवैध वाळूसाठा जप्त करून घरकुल लाभार्थ्यांना निशुल्क दरात वाळू उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता असणे , तसेच तातडीने वाळू घाट लिलाव होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे , याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२४५, नैसर्गिक आपतींच्या निवारण्यासाठी सहाय्य**<br>**बाब क्रमांक: ६१, रूपये:- १,००,००,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (३) | ६१३७ | १० | बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील महसूल मंडळ बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील सर्वच गावांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा फटका बसलेला असणे, असंख्य घरांची पडझड झालेली असणे, ग्रामीण भागात शेतकांचे भरपूर प्रमाणात नुकसान झालेले असणे, नागरिक व प्रामुख्याने शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात अडचणीत आलेला असणे, शासनाच्या दुष्काळग्रस्त यादीत तालुक्यातील पाच महसूल मंडळांपैकी फक्त तीनच मंडळांचा समावेश करण्यात आलेला असणे, त्यामुळे अतोनात नुकसान झालेल्या उर्वरित मलकापूर व नरवेल या दोन्ही महसुली मंडळातील ग्रामस्थ व शेतकऱ्यावर अन्याय झालेला असणे, दोन्ही महसूल मंडळाचा दुष्काळग्रस्त यादीमध्ये समावेश करण्याबाबत शासनाकडे वारंवार मागणी होणे, परंतु शासनाने यावर कुठलीही कार्यवाही केलेली नसणे, नागरिक व शेतकरी यांच्यामध्ये त्यामुळे शासनाप्रती प्रचंड असंतोषाची भावना निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया |
| (४) | ६१३८ | १० | बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील महसूल मंडळ बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील सर्वच गावांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा फटका बसलेला असणे, असंख्य घरांची पडझड झालेली असणे, ग्रामीण भागात शेतकांचे भरपूर प्रमाणात नुकसान झालेले असणे, नागरिक व प्रामुख्याने शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणात अडचणीत आलेला असणे, शासनाच्या दुष्काळग्रस्त यादीत तालुक्यातील पाच महसूल मंडळांपैकी फक्त तीनच मंडळांचा समावेश करण्यात आलेला असणे, त्यामुळे अतोनात नुकसान झालेल्या उर्वरित मलकापूर व नरवेल या दोन्ही महसुली मंडळातील ग्रामस्थ व शेतकऱ्यावर अन्याय झालेला असणे, दोन्ही महसूल मंडळाचा दुष्काळग्रस्त यादीमध्ये समावेश करण्याबाबत शासनाकडे वारंवार मागणी होणे, परंतु शासनाने यावर कुठलीही कार्यवाही केलेली नसणे, नागरिक व शेतकरी यांच्यामध्ये त्यामुळे शासनाप्रती प्रचंड असंतोषाची भावना निर्माण होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया |
| | | | **श्री. विश्वजित कदम** |
| (५) | ६१५६ | १० | माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२३ मध्ये पलूस-कडेगांव तालुक्यासह सांगली जिल्ह्यातील अवकाळी पावसामुळे फळ पिकांवरील द्राक्षबागांचे मोठे नुकसान झाले आहे. संपूर्ण सांगली जिल्ह्यातील ३३७९१ हेक्टरपैकी १६९६४ हेक्टर फळपिकावरील द्राक्षबागेचे नुकसान होवून सुमारे २५०० कोटी रुपयाचे अंदाजे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नुकसान झालेले असणे, अवकाळी पाऊस तसेच ढगाळ वातावरण, दाट धुके या लहरी वातावरणात द्राक्षबागा सापडलेल्या आहेत. डाऊनी, भुरी, करपा या भयानक रोगामुळे द्राक्षगळ, फळकूज होवून काही तयार होत असलेल्या द्राक्षांच्या घडातील मण्यांना तडे जाणे, या बागा वाचविण्यासाठी शेतकरी बांधव बाजारातील महागडी औषधे घेवून तसेच काही कंपन्या या रोगावर जालीम उपाय म्हणून बोगस औषधे घेवून शेतकरी त्यांच्या बागा वाचविण्याचे प्रयत्न करीत असून सन २०२१-२०२२ व २०२३ या तीन वर्षात शेतकऱ्यांना सतत अवकाळीचा तडाखा बसणे, राष्ट्रीयकृत बँका, पतसंस्था तसेच सहकारी बँका व खाजगी सावकाराकडून कर्जे घेवूनही द्राक्षपिक करणाऱ्या अवकाळीच्या नुकसानीमुळे त्यांच्या द्राक्षपिकांच्या बागा तोडून बँकाच्या तसेच सावकराच्या कर्जासाठी जमिनी विकण्याची वेळ येणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करुन या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची सर्व बँकाची सर्व प्रकारची कर्ज माफ करून आर्थिक मदत देण्याबाबत करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (६) | ६०९९ | १० | अमरावती जिल्ह्यात सन २०२३-२४ या कालावधीत वीज , अतिवृष्टी , सततचा पाऊस , अवकाळी पाऊस या नैसर्गिक आपत्ति अंतर्गत पडझड झालेल्या घर, गोठे व झोपड्यांकरिता जिल्हा प्रशासनामार्फत १ कोटी ८५ लक्ष रुपयांची मागणी शासनास माहे ३० मे २०२३ रोजी लेखी पत्राद्वारे केलेली असणे , परंतु अद्यापही शासनामार्फत निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नसणे , यामुळे नुकसानग्रस्त नागरिक शासकीय मदतीपासून वंचीत असणे , जिल्हा प्रशासनमार्फत मागणी करण्यात आलेल्या निधी तातडीने उपलब्ध करून देण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ६१०६ | १० | अमरावती जिल्ह्यात माहे नोव्हेंबर २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात तूर , कपाशी , पानपिपरी , केळी , संत्री , व रब्बी हंगामातील शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे , अवकाळी पावसामुळे अमरावती जिल्ह्यातील अंदाजे २७००० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झालेले असणे ,परंतु राज्य शासनामार्फत जाहीर केलेल्या नुकसानग्रस्त २२ जिल्ह्यांच्या यादीत अमरावती जिल्ह्याचा समावेश नसणे, यामुळे जिल्ह्यातील शेतकरी शासकीय मंदतीपासून वंचीत राहणार असणे , नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने शासकीय मदत देण्याच्या दृष्टीने अमरावती जिल्ह्याचा नुकसानग्रस्त जिल्ह्याच्या यादीत समावेश करण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (८) | ६०९५ | १० | नागपूर व विदर्भ विभागात मोठया प्रमाणावर माहे नोव्हेंबर-डिसेंबर,२०२३ च्या दरम्यान पाऊस पडून नैसर्गिक आपत्ती निर्माण झाली असणे, नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले असणे, नैसर्गिक आपत्तीची आर्थिक मदत करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शेतकऱ्यांत व स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०६ , वनीकरण व वन्यजीव**<br>**बाब क्रमांक: ६२, रूपये:- ३०,००,००,०००/-**<br>**श्री. विश्वजित कदम** |
| (९) | ६१३९ | १० | सांगली जिल्हयातील पलूस-कडेगांव येथील मानव निर्मित यशवंतराव चव्हाण वन्यजीव अभयारण्य १०.८४ चौरस कि.मी. क्षेत्रावरती असून या ठिकाणी तीर्थक्षेत्र, पर्यटन व प्रेक्षणीय स्थळे असलेने मोठ्याप्रमाणावर भाविक व पर्यटक येत असणे, त्याचबरोबर वन्यजीव संपत्ती हरीण, सांबर, काळवीट, भेर, तरस इ. मोठ्या प्रमाणावर पहावयास मिळत असल्याने परदेशी पर्यटक सुध्दा याठिकाणी येत असणे,परंतू मागील काही वर्षापासून उन्हाळ्याच्या कालावधीत चारा व पाण्याच्या शोधात अभयारण्यातील हरीण, काळवीट हे प्राणी कुंपण नसल्याने लगतच्या गावातील शेती पिकांचे मोठ्याप्रमाणावर नुकसान करत असणे, त्यामुळे परिसरातील शेतकरी हतबल होण, तसेच वन्यप्राण्याची जीवितहानी सुद्धा होणे, परंतु अद्याप ३ कि. मी. क्षेत्रासाठी कुंपण नसल्याने आजुबाजुच्या परिसरातील ग्रामस्थांमध्ये पसरलेले भितीचे वातावरणे याबाबत राज्य शासनाने कार्यवाही करुन अत्यावश्यक त्याठिकाणी वन्यजीवापासून संरक्षण मिळण्यासाठी कुंपण करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (१०) | ६१०७ | १० | अमरावती जिल्ह्यातील शहानुर मध्यम सिंचन प्रकल्प ता. अंजनगाव सुर्जी मेलघाटच्या पायथ्याशी असणे , नैसर्गिक आणि वनांचे सौन्दर्य लाभलेल्या या प्रकल्पावर मोठ्या प्रमाणात पर्यटकांची ये जा असणे , परंतु सदर ठिकाणी पर्यटन च्या दृष्टीने कोणत्याही सोयीसुविधा नसणे , वनविभागचा बहुतांश भाग असल्याने या ठिकाणी पर्यटकांचे विशेष आकर्षण असणे , सदर ठिकाणी इको टुरिजम अंतर्गत वनपर्यटन केंद्र अंतर्गत विकसीत केल्यास अंजनगाव सुर्जी तालुक्यातील तसेच या भागातील युवकांना रोजगार उपलब्ध होणार असणे , तसेच पर्यटन केंद्र सुरू झाल्यास शासनाच्या महसुलात वाढ होणार असणे , सदर ठिकाणी वनपर्यटन केंद्र विकसीत करण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका " |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (११) | ६०९६ | १० | मुंबई उपनगरातील बोरिवली (पूर्व) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये इको-टुरिझम योजना राबविण्याची आवश्यकता असणे, मिनी ट्रेन वारंवार बंद पडत असणे ती चांगल्या दर्जाची करण्याची गरज असणे, सफारी गाडी जुनी झाली असून ती सफारी गाडी वारंवार बंद पडत असणे, प्राण्यांची संख्या कमी होत असणे,ती वाढविण्याची आवश्यकता असणे, इको टुरिझम वाढविण्याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : ८ डिसेंबर, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) महसूल व वन विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर